नदीजोड प्रकल्पाच्या कामांसाठी आवश्यक परवानग्या लवकर मिळवाव्यात
>> पान 2

हल्ली भिकारीसुद्धा एक रुपया घेत नाही पण आम्ही शेतकऱ्यांना १ रुपयांत पीक विमा दिला : कोकाटे
>> पान 3

ग्रामपंचायत प्रशासन तक्रार करून करून त्रस्त, संबंधित पाणीपुरवठा अधिकारी मात्र मस्त; ठेकेदार झाले सुस्त
>> पान 4

सुविचार

आत्मविश्वासाने कोणतेही आव्हान सहज पार करता येते.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



व्हॅलेंटाइनच्या मुहूर्तावर उर्फीने दिली गुड न्यूज! गुपचूप केला साखरपुडा?

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई आतील पान

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 185 ■ शनिवार, दि. 15 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## महाराष्ट्र सरकारने नवीन फौजदारी कायदे आयुक्तालयांमध्ये लवकरात लवकर लागू करावेत

### सात वर्षांहून अधिक शिक्षेच्या गुन्ह्यांमध्ये ९० टक्क्यांपेक्षा जास्त दोषसिद्धी दर मिळवण्यासाठी प्रयत्न करावेत : गृहमंत्री अमित शाह

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज नवी दिल्लीत महाराष्ट्रातील नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीसंदर्भात आढावा बैठक घेतली. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. या बैठकीत राज्यातील पोलीस, कारागृहे, न्यायालये, अभियोजन आणि फॉरेन्सिक यासंबंधीच्या विविध नवीन तरतुदींच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.**

या बैठकीला केंद्रीय गृह सचिव, महाराष्ट्राचे मुख्य सचिव, महाराष्ट्राचे पोलिस महासंचालक, पोलीस संशोधन आणि विकास ब्युरो (बीपीआरडी)चे महासंचालक, राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरो (एनसीआरबी) चे महासंचालक तसेच केंद्रीय गृह मंत्रालय आणि राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले की, मोदी सरकार देशातील नागरिकांना जलद आणि पारदर्शक न्यायव्यवस्था प्रदान करण्यास वचनबद्ध आहे. कायदा व सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी गुन्ह्यांची नोंदणी होणे आवश्यक आहे आणि एफआयआर दाखल करण्यात कोणताही विलंब होता कामा नये.

महाराष्ट्रात नवीन फौजदारी कायद्यांच्या धर्तीवर एक आदर्श अभियोजन संचालनालय प्रणाली विकसित करावी, असे त्यांनी सुचवले. तसेच, ७ वर्षांपेक्षा अधिक शिक्षेच्या गुन्ह्यांमध्ये ९० टक्क्यांपेक्षा जास्त दोषसिद्धी दर >> पान २

## धस-मुंडे यांच्या भेटीनंतर धनंजय देशमुख यांनी घेतली मनोज जरांगे पाटील यांची भेट



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** आमदार सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतल्यानं एकच खळबळ उडालीय. या भेटीनंतर धनंजय देशमुख यांनी मनोज जरांगे यांची अंतरवाली सराटी येथे जाऊन भेट घेतलीय. या दोघांमध्ये धस-मुंडे भेटीबाबत चर्चा झालीय. या भेटीनंतर जरांगे यांनी धस यांच्यावर चांगलाच संताप व्यक्त केला आहे. धस यांनी सर्वात मोठा दगा दिला असून, एवढ्या लवकर ते गुडघे टेकतील असं वाटल नव्हतं असं जरांगे यांनी म्हटलं आहे. तर मी जरांगे यांच्याशी संतोष देशमुख हत्या प्रकरणाबाबत चर्चा करण्यासाठी अंतरवाली येथे आल्याचं धनंजय देशमुख यांनी म्हटलं आहे. दरम्यान, धस यांच्या मुंडे भेटीच्या प्रतिक्रियेनंतरच त्यांच्या भेटीबाबत बोलणं योग्य होईल असं धनंजय देशमुख यांनी म्हटलं आहे.

## विरोधकांनी माहिती घेऊन टीका करावी; उद्योग मंत्री उदय सामंत यांची विरोधकांवर टीका



दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** मतदारांचे आभार मानण्यासाठी एकनाथ शिंदे रत्नागिरी दौऱ्यावर येत आहेत.काही मोठे प्रवेश उद्या एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश घेणार आहेत.ज्यावेळी मुंबईत बैठक सुरू होती, त्यावेळी एकनाथ शिंदे नाशिकमध्ये होते. जरी बैठकीला उपस्थित नव्हते तरी, समन्वय चांगला आहे. विरोधकांनी माहिती घेऊन टीका करावी, उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विरोधकांवर केली. रत्नागिरी येथे माध्यभागी बोलताना उद्योग मंत्री उदय सामंत म्हणाले की, प्रयागराजमध्ये ज्यांना जायचं नाही त्यांनी जाऊ नये, ज्यांना जिथे डुबकी मारायची तिथे त्यांनी मारावी, मात्र, भाविकांचा अपमान करू नये, विरोधक हे टीका करण्यासाठीच असतात.भविष्यात काय जेवायचं असेही आदेश निघतील.चिकन खायचं की मटण खायचं? राजकारणामध्ये कोणी कोणाला मदत केली हा राजकीय रणनीतीचा भाग आहे, ज्यांना कळली तो जिंकतो, ज्याला नाही कळली तो पडतो. राजकारणातल्या सर्व रणनीती सांगायला लागलो. तर त्याला काही अर्थ नाही, त्यालाच राजकारण म्हणतात.असे मत उद्योग मंत्री प्रफुल उदय सामंत यांनी व्यक्त केले.

## ४० देशांतील युवा नेत्यांचा राज्यपालांशी संवाद

**मुंबई/प्रतिनिधी :** वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम अंतर्गत फोरम ऑफ यंग ग्लोबल लिडर्सच्या ५० युवा सदस्यांनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवन, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. भारताच्या शैक्षणिक दौऱ्यावर आलेल्या ४० देशांतील या नेत्यांनी राज्यपालांशी संवाद साधला.

जगभरातील युवा नेत्यांच्या सुसंवादातून जगासमोरील सामायिक आव्हानांवर उपाय शोधता येतील असे सांगून युवकांनी संपत्ती निर्माण करावी मात्र अर्जित संपत्तीचा विनियोग समाजासाठी करावा असे आवाहन राज्यपालांनी केले.

## सुरेश धस यांनी घेतली धनंजय मुंडेंची भेट

### तब्येतीची विचारपूस करण्यासाठी भेटल्याचा दावा, समेटाची शक्यता फेटाळली

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणावरुन आमने सामने आलेले भाजप आमदार सुरेश धस आणि मंत्री धनंजय मुंडे यांची गुप्त भेट झाल्याची माहिती समोर आली आहे. एबीपी माझाला सूत्रांनी ही माहिती दिली आहे. एका खासगी रुग्णालयात सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांची ही भेट झाल्याचं सांगण्यात येत आहे. साधारण चार पाच दिवसांपूर्वी ही भेट झाल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे. संतोष देशमुख यांची हत्याप्रकरणातील खंडणीच्या गुन्ह्यात धनंजय मुंडे यांचे सर्वात जवळचे कार्यकर्ते वाल्मिक कराड हे सध्या कोठडीत आहेत. सुरेश धस यांनी हे प्रकरण लावून धरलेलं असताना, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या धनंजय मुंडे यांना टार्गेट केलं आहे. मात्र आता सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांची गुप्त भेट झाल्याची माहिती समोर आल्याने, आश्र्चर्य व्यक्त होत आहे.



दरम्यान, या भेटीबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया म्हणाल्या, हे सर्व सरप्राईजिंग आहे. माझ्या माहितीनुसार भाजप नेते आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दोघांमध्ये समेट घडवून आणली आहे. पण ही अतिशय गंभीर बाब आहे

सुरेश धस म्हणाले, धनंजय मुंडे यांचं ऑपरेशन झालेलं आहे. त्यादिवशी रात्री त्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आलं. दुसऱ्या दिवशी झाकून-लपून नाही. तर त्यांच्या निवासस्थानी भेटायला गेलो होतो. त्यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यात गेलो होतो. त्यांच्याविरोधातील लढा आणि भेट या वेगळ्या गोष्टी आहेत. बावनकुळे साहेब आणि माझी आता भेट होईल. पर्वा भेटलो ते त्यांच्या प्रकृतीची चौकशी करायला गेलो होतो. >> पान २

## शिवसेनेच्या मंत्र्यांच्या कामाचा आढावा घेण्यासाठी समन्वय कक्ष : एकनाथ शिंदे

दैनिक आपला विदर्भ



**नाशिक/प्रतिनिधी :** पालकमंत्री पदाबाबत कुठलाही वाद नाही. शिवसेनेच्या मंत्र्यांचा च्या कामाचा आढावा घेण्यासाठी समन्वय कक्ष स्थापन करण्यात आला आहे,अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांश बोलताना दिली.

नाशिक दौऱ्यावर असताना प्रसारमाध्यमाशी संवाद साधताना ते म्हणाले की, आता मी इकडे आलोय, कुंभमेळ्याच्या तयारीसाठी मुख्यमंत्र्यांनी अगोदर बैठक घेतलीय. गिरीश महाजनही बैठकीला होते. त्यांना आम्ही आता थांबायचं नाही, अशा सुचना दिल्या आहेत. नाशिकला कुंभमेळा हे आपलं भाग्य आहे. महायुतीला दिलेल्या भरघोस मतांमुळे नाशिकरांचे आभार माणण्यासाठी आलोय. आमच्यात कुठलाही वॉर नाही. तुम्हीच गफलत करत आहात. मोठे प्रकल्प सीएम वॉर रूमध्ये घेतले जातात. त्याच्या प्रगतीचा आढावा घेतला जातोय. शिवसेनेच्या मंत्र्यांच्या कामाचा आढावा घेण्यासाठी समन्वय कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तो वॉर रूम नाही. अजीत पवारांचाही समन्वय कक्ष आहे.मंत्र्याकडे असलेल्या कामाचा आढावा घेण्यासाठी हा कक्ष असतो अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

## सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सुदर्शन घुलेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**बीड/प्रतिनिधी :** सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील प्रमुख आरोपी असलेल्या सुदर्शन घुलेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आलीय. सुदर्शन घुलेला आवादा कंपनीकडे खंडणी मागितल्याप्रकरणी १२ फेब्रुवारी रोजी केज न्यायालयात हजर करण्यात आले होते, त्यानंतर त्याला दोन दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली होती. मग आज १४ फेब्रुवारी रोजी पुन्हा एकदा केज न्यायालयात त्याला हजर केले असता केज न्यायालयाने सुदर्शन घुलेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावलीय. >> पान २

## दोषी नाही तर कारवाई नाही! देवगिरीवरच्या बैठकीनंतर अजित पवारांकडून धनंजय मुंडेंना पुन्हा अभय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** धनंजय मुंडेंवरचे आरोप जोपर्यंत सिद्ध होणार नाहीत तोपर्यंत त्यांच्यावर कारवाई करणार नसल्याचीच उपमुख्यमंत्री अजित पवारांनी घेतली असून दोषी नाही तर कारवाई नाही, असं म्हणत पुन्हा एकदा अजित पवारांनी धनंजय मुंडे यांची पाठराखण केल्याचं समजतेय. धनंजय मुंडे, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्याशी देवगिरीत झालेल्या बैठकीत अजित पवारांनी ही भूमिका स्पष्ट केल्याची माहिती सूत्रांनी दिली. गुरुवारी सुरेश धस यांनी अजित पवारांच्या भेटीची मागणी केली होती, मात्र अजित पवारांनी ही भेट नाकारली होती. दरम्यान, देवगिरी बंगल्यावर गुरुवारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या बड्या नेत्यांसोबत झालेल्या अनौपचारिक बैठकीत अजित पवारांनी ठाम भूमिका मांडली. धनंजय मुंडे यांच्यावरील आरोप, पुरावे जोपर्यंत नाहीत तोपर्यंत पक्ष कारवाई करणार नाही अशी भूमिका त्यांनी घेतलीय.

गेल्या अनेक दिवसांपासून धनंजय मुंडेंवर संतोष देशमुख प्रकरण, वाल्मिक कराडशी असणारे आर्थिक हितसंबंध, कृषीघोटाळ्यावरून आरोप होत आहेत. धनंजय मुंडेंचा राजिनामा घ्यावा असा दबाव वाढत असताना दुसरीकडे करुणा मुंडेंनी ओढलेले ताशेरे आणि वारंवार होणाऱ्या आरोपांमुळे पक्षाची बदनामी होत आहे. या अनुषंगाने गुरुवारी रात्री देवगिरी बंगल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या बड्या नेत्यांशी उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दोन तास चर्चा केली. या चर्चेदरम्यान धनंजय मुंडेंवरील आरोप जोपर्यंत सिद्ध होत नाही तोपर्यंत पक्ष कोणतीही कारवाई करणार नसल्याची भूमिका घेत पुन्हा एकदा अजित पवारांनी धनंजय मुंडेंची पाठराखण केली आहे.



एकीकडे धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याचा दबाव विरोधकांनी वाढवला आहे .दरम्यान ,करुणा मुंडेंची असलेली न्यायालयीन लढाई पाहता धनंजय मुंडेंवर वारंवारता आशरे ओढले जात असल्याने पक्षाची प्रचंड बदनामी होत असल्याने गुरुवारी रात्री उशिरा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा महत्त्वाचा नेत्यांची बैठक पार पडली . राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार ,पटेल राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल ,प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि धनंजय मुंडे देवगिरी बंगल्यावर उपस्थित होते .साधारणपणे दोन तास चाललेल्या या बैठकीत जोपर्यंत धनंजय मुंडेंवरील आरोप सिद्ध होत नाही तोपर्यंत पक्ष कारवाईची भूमिका घेणार नाही हाच सूर नेत्यांचा होता अशी माहिती सूत्रांनी दिली .एकीकडे संतोष देशमुख हत्या प्रकरणातले आरोप प्रत्यारोप तर दुसरीकडे कृषी घोटाळ्याच्या अहवालाची प्रतीक्षा . कृषी घोटाळ्याचा अहवाल येईपर्यंत कोणतीही कारवाई नको अशीच भूमिका नेत्यांनी घेतल्याचं समोर येतंय.

## थोर क्रांतिकारी संत श्री सेवालाल महाराज

आज १५ फेब्रुवारी, बंजारा समाजातील महान क्रांतिकारक संत श्री सेवालाल महाराज यांची २८६ वी जयंती. मध्ययुगात भारतात अनेक क्रांतिकारक संत महात्मे होऊन गेले ज्यांनी आपल्या आपल्या वर्तनातून, कीर्तनातून, विचारातून समाजात भक्तिभाव तर निर्माण केलाच पण येणाऱ्या अनेक पिढ्यांना मार्गदर्शन होईल असे तत्वज्ञान सांगितले त्यात श्री संत श्री सेवालाल महाराज हे एक होते. संत श्री सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ रोजी तांडा गुत्ती बेल्लारी अनंतपुर जिल्हा आंध्रप्रदेश या ठिकाणी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भीमा नाईक असे होते. भीमा नाईक हे त्याकाळात अतिशय श्रीमंत व्यक्ती म्हणून ओळखले जात. असे म्हणतात की भीमा नाईक यांच्या घरी इतकी श्रीमंती होती की त्यांच्या सात पिढ्या बसून आरामात जेवण करतील. त्यांच्याकडे सुमारे पाच हजार बैल आणि गाया होत्या. ते ४१ तांड्यांचे नायक होते. घरी लक्ष्मी पाणी भरत असूनही सेवालाल महाराजांचे मन रमत नव्हते. आपल्या बंजारा समाजातील लोक जुन्या रूढी परंपरांना कवटाळून बसला असल्याने बंजारा समाज इतर समाजाच्या मानाने खूप मागे आहे. या समाजातील हाच मागासलेलापणा दूर करण्यासाठी काही तरी करावे असे त्यांना सतत वाटत होते. त्यांच्या आई धर्मली यांनी त्यांना लहानपणीच वीरांच्या गोष्टी सांगितल्या होत्या. आईच्या शिकवणुकीचा त्यांच्यावर खूप प्रभाव होता. आपल्या बंजारा समाजात अनेक अनिष्ट चालीरिती आहेत. या अनिष्ट चालीरिती मुळेच समाज मागे आहे हे त्यांनी जाणले. बंजारा समाजाला इतर समाजाच्या बरोबरीने न्यायचे असेल तर त्यांच्यात असणाऱ्या अनिष्ट, बुरसटलेल्या चालीरिती बंद करून त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण केला पाहिजे असा विचार करून त्यांनी समाजामध्ये जनजागृती केली. बंजारा समाजातील बांधवांनी अंधश्रद्धेला मूठमाती द्यावी असा त्यांचा आग्रह असायचा. अंधश्रद्धेमुळेच समाज मागे आहे असे त्यांचे ठाम मत होते. कोणत्याही गोष्टीवर डोळे झाकून विश्वास ठेवू नका. कोणतीही गोष्ट पारखून, समजून घ्या मगच विश्वास ठेवा असे ते म्हणत. त्यांना गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष असा भेदभाव मान्य नव्हता म्हणूनच घरची श्रीमंती असूनही त्यांनी आपल्या पुतण्याच्या विवाह एका गरीब कुटुंबातील मुलीशी लावून दिला होता. २५० वर्षापूर्वीच श्री संत सेवालाल महाराजांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाची शिकवण समाजाला दिली होती. श्री संत सेवालाल महाराज हे केवळ थोर विचारवंतच नव्हते तर ते एक थोर सेनानीही होते. दिल्लीचा नवाब गुलाब खान मोहंमद खान याच्याशी सेवालाल महाराज यांच्याशी लढाई झाली या लढाईत सेवालाल महाराजांनी मर्दुमकी गाजवत विजय मिळवला. श्री संत सेवालाल महाराजांनी भारतीय स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार केला त्यावेळी उमाजी नाईक, तंट्या भिल्ल यासारखे शुर सेनानी त्यांच्यासोबत होते. भारतीय इतिहासातील थोर विचारवंत आणि थोर सेनानी अशी ओळख असलेल्या श्री संत सेवालाल महाराजांचे २ जानेवारी १७७३ रोजी रुईगड, तालुका मानोरा जिल्हा वाशिम येथे निधन झाले. थोर विचारवंत, समाजसेवक त्याच सोबत शुर सेनानी असणाऱ्या श्री संत सेवालाल महाराजांचे विचार आजच्याच पिढीला नव्हे तर येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारे आहे. त्यांचे विचार आत्मसात करून त्या विचारांवर चालण्याचा संकल्प करणे हीच त्यांच्या जन्मदिनी त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. थोर विचारवंत, थोर सेनानी श्री संत सेवालाल महाराजांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# नदीजोड प्रकल्पाच्या कामांसाठी आवश्यक परवानग्या लवकर मिळवाव्यात

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या सूचना

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** नदीजोड प्रकल्पांची कामे विहित वेळेत सुरू होण्यासाठी या कामासाठी आवश्यक असलेल्या पर्यावरण, वन विभागासह अन्य आवश्यक परवानग्या जलसंपदा विभागाने लवकरात लवकर मिळवाव्यात, अशा सूचना जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी दिल्या



पश्रि्चम वाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याबाबतचा आढावा जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी घेतला. सह्याद्री अतिथी गृह येथे झालेल्या या बैठकीस बैठकीस जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, लाभ क्षेत्र विकास सचिव संजय बेलसरे, मुख्य अभियंता तथा सहसचिव अभय पाठक, प्रसाद नार्वेकर, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, गोदावरी खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार आदी उपस्थित होते.

जलसंपदा मंत्री विखे पाटील म्हणाले, राज्यातील अवर्षण प्रवण भागाला सिंचनासाठी व पिण्यासाठी पाणी उपलब्ध व्हावे, म्हणून शासनाने नदीजोड प्रकल्प हाती घेतला आहे. प्रकल्पाची कामे लांबल्याने लोकांच्या अपेक्षा पूर्ण होत नाहीत व प्रकल्पाचा खर्चही वाढतो. त्यामुळे या प्रकल्पांची कामे विहित मुदतीत सुरू होणे आवश्यक असल्याने आवश्यक प्रक्रिया विभागाने सुरू करावी. या कामांचे सूक्ष्म नियोजन करावे. आराखड्यानुसार कामे विहित कालावधीत पूर्ण करावीत असेही निर्देशही विखे पाटील यांनी दिले.

## व्हॅलेंटाइनच्या मुहूर्तावर उर्फीने दिली गुड न्यूज! गुपचूप केला साखरपुडा?

**मुंबई/प्रतिनिधी :** उर्फी जावेद पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका फोटोमुळे तिच्या चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. या फोटोत उर्फीच्या बोटात एक मुलगा अंगठी घालताना दिसत आहे. हा फोटो एका साखरपुड्याचा असल्याचे दिसून येत आहे. यामुळे सोशल मीडियावर उर्फीने गुपचूप साखरपुडा केला की हे एखाद्या प्रमोशनचा भाग आहे, अशा चर्चा सुरू झाल्या आहेत. चाहत्यांनी या फोटोवर कमेंट करत वेगवेगळे अंदाज लावले. अखेर उर्फीने एका नवीन पोस्टद्वारे याबद्दल खुलासा केला.

उर्फीने केला साखरपुडा?

उर्फीच्या या फोटोमुळे अनेकांनी तिला तिच्या साखरपुड्याबद्दल अभिनंदन करण्यास सुरुवात केली. मात्र, तिचे अनेक चाहते या फोटोला प्रमोशनल स्टंट म्हणत होते. अखेर उर्फीने एका व्हिडिओसह पोस्ट शेअर करत खुलासा केला.

उर्फीने व्हिडिओत ती म्हणते की, हे प्रेम सोपे नाहीये, फक्त हे समजून घ्या की विश्र्वासघाताचा धोका आहे, निघून जाण्यापूर्वी तुम्हाला त्यांना थांबवावे लागेल. एपसरसशवठेझरधरऊ्हेझर आणि हा शो १४ फेब्रुवारीपासून डिस्ने+ हॉटस्टारवर स्ट्रीम होईल. म्हणजेच उर्फीने साखरपुडा केला नसून हा तिच्या आगामी प्रोजेक्टचा भाग आहे. साखरपुड्याचे फोटो आणि व्हिडिओ हे तिच्या आगामी शोचे प्रमोशन असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## राष्ट्रवादीचे माजी आमदार तुकाराम बिडकर यांचे अपघाती निधन, कुंभारी गावात पार पडले अंत्यसंस्कार






**दैनिक आपला विदर्भ**

**अकोला/प्रतिनिधी :** अकोल्यात राष्ट्रवादीचे माजी आमदार तुकाराम बिडकर यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार पार पडले. अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते आणि मुर्तीजापुरचे माजी आमदार प्रा. तुकाराम बिरकड यांचे काल अपघातात दुःखद निधन झाले. ते विदर्भ वैधानिक विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष होते. अकोल्यातल्या कुंभारी गावातील बीपीएड महाविद्यालयाच्या मैदानावर त्यांच्यावर अंत्यसंस्कार पार पडले.

यावेळी राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ, कामगार मंत्री आणि पालकमंत्री आकाश फुंडकर, वर्ध्याचे राष्ट्रवादीचे खासदार अमर काळे, आमदार अमोल मिटकरी, आमदार साजिद खान पठाण, आमदार नितीन देशमुख, शेतकरी नेते रविकांत तुपकर आणि अकोल्यातले भाजपचे सर्वच आमदारांसह सर्वपक्षीय नेते अंतिम दर्शनासाठी उपस्थित होते. दरम्यान, आज जुना सहकारी गमावला असल्याची दु:खद भावना भुजबळांनी व्यक्त केली आहे. तसेच त्यांनी बिरकडांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला आहे.

## शासनाने एक रुपया घेऊन पीक विमा दिला म्हणजे शेतकऱ्यांवर कोणतेही उपकार केले नाहीत - जयश्री शेळके

**बुलडाणा/प्रतिनिधी :** हल्ली भिकारी ही एक रुपया घेत नाही, पण आम्ही शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विमा दिला. असे वक्तव्य



राज्याचे कृषिमंत्रीच करत असेल तर ती या राज्यासाठी मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे. कृषिमंत्र्यांनी राज्य शासनाने एक रुपया घेऊन पीक विमा दिला म्हणजे शेतकऱ्यांवर कोणतेही प्रकारचे उपकार केले नाहीत. शेतकऱ्यांकडून एक-एक रुपया घेणारे भिकारडे राज्य सरकार शेतकऱ्यांना हक्काचा पीक विमा देऊ शकले नाही, ही वस्तुस्थिती आहे. शेतकऱ्यांकडून घेतलेल्या एक-एक रुपयांवर करोडो कोटींचे घोटाळे करणाऱ्या राज्य सरकारचा आणि अशा कृतघ्न आणि निर्लज्ज कृषीमंत्र्यांचा जाहीर निषेध शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाच्या नेत्या जयश्री शेळके यांनी केला आहे.

पान १ वरून...

### महाराष्ट्र सरकारने नवीन

मिळवण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश दिले. पोलिस, सरकारी वकील आणि न्यायपालिका यांनी समन्वय साधून दोषींना शक्य तितक्या लवकर शिक्षा व्हावी, यासाठी प्रयत्न करावेत.

गृहमंत्र्यांनी सांगितले की, संगठित गुन्हेगारी, दहशतवाद आणि जमावाकडून होणाऱ्या हिंसेच्या घटनांवर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी नियमितपणे देखरेख ठेवली पाहिजे, जेणेकरून या तरतुदींचा गैरवापर होऊ नये. तसेच, कारागृहे, सरकारी रुग्णालये, बँका आणि फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी (एफएसएल) येथे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे पुरावे नोंदविण्याची प्रणाली विकसित करावी.

गृहमंत्र्यांनी महाराष्ट्रला सीसीटीएनएस २.० आणि खउगड २.० प्रणाली स्वीकारण्याचा सल्ला दिला आणि दोन वेगवेगळ्या राज्यांमध्ये एफआयआरचे हस्तांतर सहज करता यावे यासाठी सीसीटीएनएस प्रणाली विकसित करावी, असे सुचवले.

गृहमंत्र्यांनी असेही सांगितले की, पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतलेल्या व्यक्तींची माहिती इलेक्ट्रॉनिक डॅशबोर्डवर उपलब्ध करून द्यावी. तसेच, राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये इंटरनेट कनेक्टिव्हिटी सुधारण्याची आवश्यकता आहे.

गृहमंत्र्यांनी असेही स्पष्ट केले की, प्रत्येक पोलीस उपविभागात फॉरेन्सिक सायन्स मोबाईल व्हॅन्स उपलब्ध असाव्यात आणि फॉरेन्सिक तज्ञांची भरती वेगाने करावी. यासाठी रिक्त पदे लवकरात लवकर भरली जावीत.

महाराष्ट्र सरकारने राज्यातील फिंगरप्रिंट ओळख प्रणालीला 'राष्ट्रीय स्वयंचलित फिंगरप्रिंट ओळख प्रणाली (छ-ऋखड)' शी जोडावे, असेही निर्देश गृहमंत्र्यांनी दिले. तसेच, नवीन फौजदारी कायद्यांतर्गत गुन्हेगारांकडून जप्त केलेली संपत्ती त्वरित मूळ मालकाकडे परत करण्यासाठी एक प्रभावी प्रणाली विकसित करण्याचे निर्देश दिले.

गृहमंत्र्यांनी पोलीस ठाण्यांचे सौंदर्यीकरण आणि सुधारणांवर भर देण्याचे महत्त्वही अधोरेखित केले.

गृहमंत्र्यांनी सांगितले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राज्यातील नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचा दर पंधरवड्याला एकदा आढावा घ्यावा, तर मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालक यांनी आठवड्याला एकदा याचा आढावा घ्यावा.

### सुरेश धस यांनी घेतली

दरम्यान, धनंजय मुंडे यांच्या कार्यालयाने भेटीच्या वृत्ताचं खंडण करण्यात आलं आहे. अशी कोणतीही भेट झालेली नसल्याचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या कार्यालयाकडून सांगण्यात आलं आहे.

चंद्रशेखर बावनकुळे नेमकं काय म्हणाले?

आम्ही चार साडेचार तास एकत्र होतो, सुरेश धस आणि धनंजय मुंडे दोघेही होते. दोघांमध्ये मतभेद आहेत, मनभेद नाहीत. दोघेही इमोशनल आहेत.दोघांमध्ये थोडे मतभेद आहेत, ते दूर होतील. माणसाच्या जीवनात थोडा काळ असा असतो, काळ मतभेद दूर करतो. काही काळाने धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांचे मतभेद दूर होतील. मी पक्षाचा अध्यक्ष आहे, माझ्याकडे दोघेही भेटले. धनंजय मुंडेंनी भाजपच्या प्रवासासोबत माझ्यासोबत काम केलं आहे. त्यामुळे धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्यातील भेट ही पारिवारीक भेट झाली आहे.आम्ही तिघेही परिवार म्हणून बसलो होतो. त्यांच्या मतभेद आहेत, मनभेद नाहीत.

धनंजय देशमुख काय म्हणाले?

धनंजय देशमुख म्हणाले, सुरेश धस यांची भूमिका न्यायाची आहे. ते आम्हाला न्याय मिळवून देतील, अशी आशा आहे.

अंजली दमानियांची पहिली प्रतिक्रिया

अंजली दमानिया म्हणाल्या, मला देखील चार ते पाच दिवसांपूर्वी असं समजलं होतं की, दोघांची भेट झाली. मात्र, मला असं सांगण्यात आलं होतं चंद्रशेखर बावनकुळे यांनी मध्यस्थी केली. पण अशी भेट झाली असेल तर फार दुर्दैवी आहे. कारण आता सुरेश धस मग त्यांच्याविरोधात लढतील की नाही? हे सर्व मला विक्षिप्त वाटतं आहे. आकाचा आका आहे वगैरे बोलत होते. आताच्या घडीला हे समोर येत असेल तर कठीण आहे. हे अतिशय चुकीचं आहे.

सुषमा अंधारे काय काय म्हणाल्या?

सुषमा अंधारे म्हणाल्या, सुरेश धस आणि मुंडेंची भेट झाली की नाही माहिती नाही. मात्र, मी बातम्या पाहत आहे. यामध्ये तथ्य असेल तर सुरेश धस यांची विश्र्वासार्हता संपलेली आहे. यासोबत देवेंद्र फडणवीस यांची विश्र्वासार्हता देखील संपलेली असेल.

### सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात

सुदर्शन घुले हा प्रमुख आरोपी : सुदर्शन घुले याला न्यायालयीन कोठडीत असताना दोन वेळा पोलीस कोठडी देण्यात आली होती, त्यामध्ये सुदर्शन घुलेंचे व्हाईस सॅम्पलदेखील घेण्यात आलेत, याचं कारण म्हणजे २९ नोव्हेंबर २०२४ रोजी आवादा कंपनीकडे खंडणी मागितल्याप्रकरणी ज्या फोनवरून कॉल केले, त्यामध्ये सुदर्शन घुले हा प्रमुख आरोपी आहे. त्याम ुळे त्याला न्यायालयीन कोठडीतून दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. या दरम्यान पोलिसांनी सुदर्शन घुलेचे व्हाईस सॅम्पल घेतले आणि ते न्यायालयातदेखील हजर केलेत आणि पुन्हा एकदा सुदर्शन घुलेला जेलमध्ये पाठवण्यात आलंय.

कृष्णा आंधळे हा आरोपी अद्यापही फरारच : एकीकडे सुदर्शन घुलेसह इतर आरोपी अटकेत आहेत, मात्र कृष्णा आंधळे हा आरोपी अद्यापही फरारच आहे, त्याला अटक करावी, अशी मागणी संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख हे वारंवार करीत आहेत. मात्र कृष्णा आंधळे हा स्थानिक गुन्हे शाखेसह एसआयटी आणि सीआयडीला गुंगारा देत तो सापडत नसल्याने सगळ्यांसमोरच प्रश्नचिन्ह निर्माण झालंय. यामध्ये दुसरी एक टीम यासंदर्भात काम करीत असल्याचं धनंजय देशमुख यांनी सांगितलंय. यामध्ये डॉ. सुभाष वायबसे, बालाजी तांदळे, संजय केदार, मोराळे या व्यक्तींना सहआरोपी करावे, अशी मागणी धनंजय देशमुख यांनी केलीय. मात्र ज्यावेळेस पोलीस प्रशासनाला विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, त्यांनी या आरोपींना कुठल्याही प्रकारचे सहकार्य केलेलं नाही किंवा त्याचा या प्रकरणाशी काहीही संबंध येत नाही, असं सांगण्यात येत आहे. त्यामुळे धनंजय देशमुख जे आरोप करीत आहेत, त्यावर आता एसआयटी, सीआयडी आणि स्थानिक गुन्हे शाखा नेमका काय निर्णय घेतात हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# हल्ली भिकारीसुद्धा एक रुपया घेत नाही पण आम्ही शेतकऱ्यांना १ रुपयांत पीक विमा दिला : कोकाटे

**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी :** महायुती सरकारच्या काळात पीक विमा योजनेत प्रचंड मोठा भ्रष्टाचार झाल्याचे आरोप विरोधकांकडून होत असतानाच राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी एक महत्त्वाचे वक्तव्य केले आहे. हल्ली भिकारीसुद्धा एक रुपया घेत नाही. पण आम्ही एक रुपयात शेतकऱ्यांना पीक विमा दिला, असे माणिकराव कोकाटे यांनी म्हटले. त्यांच्या या वक्तव्याने वादंग निर्माण होण्याची चिन्हे आहेत. ते शुक्रवारी अमरावतीमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

महायुती सरकारने एक रुपयात पीक विमा योजना सुरु केली होती. मात्र, काही लोकांनी त्याचा गैरउपयोग केला. पीक विमा योजना ही यशस्वी झाली पाहिजे, त्याचा योग्य लाभ शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे. पीक विमा योजनेबाबत चांगले-वाईट अनुभव सरकारच्या पाठीशी आहेत. पीक विमा कंपन्या शेतकऱ्यांची लुटमार करतात. सरकारला पीक विमा योजना बंद करायची नाही. पीक विमा योजनेत सुधारणा करायची आहे. पीक विम्यातील गैरप्रकार टाळण्यासाठी काही निर्णय घ्यावे लागतील. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासोबत बैठकीत योग्य निर्णय होईल, असे माणिकराव कोकाटे यांनी म्हटले.



पीक विमा योजनेत अशाप्रकारचे गैरप्रकार झाले आहेत की, बाकीच्या राज्यातील लोकांनी ऑनलाईन अर्ज केले. त्यामुळे अर्ज खूप साचले, खूप फोफावले, त्यातून असं वाटतंय की पीक विमा खूपच चांगली योजना आहे की काय. पण प्रत्यक्ष चौकशी केल्यावर आम्हाला कळलं की आम्ही ४ लाख अर्ज नामंजूर केलेत. सरकार त्यामध्ये कुठेही अडचणीत आलेलं नाही. पण अशा पद्धतीने लोक अर्ज भरतात, कुठेतरी एजन्सी केंद्रावाले हे उद्योग करत असावेत असा माझा अंदाज आहे. त्याची चौकशी सुरु आहे, त्याच्यावर कारवाई करण्यास सांगितलं आहे. पण याच्यात सुधारणे करणे आवश्यक आहे.

पीक विम्यातील ४ लाख अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत. कृषी विभागात अधिकारी कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. त्यामुळे आकृती बंद करून नवीन भरती संदर्भात शासन विचार करेल. कृषी विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांची शेतकऱ्यांना संपर्क साधण्यासाठी एक सिरीजमध्ये नंबर देणार आहे. कृषी मंर्त्यापासून तर शेवटच्या कर्मचाऱ्यापर्यंत हा परमनंट नंबर असेल, असे कृषिमंत्री माणिक कोकाटे यांनी म्हटले.

वादग्रस्त ठरलेल्या एक रुपयांत पिक विमा योजनेत बदल होण्याची शक्यता असून पीक विमा योजना एक रुपयांत देण्याऐवजी १०० रुपयांत देण्याचा निर्णय होणार आहे. अल्पभूधारक शेतकऱ्याला एक रुपयांतच पीक विमा ठेवण्याच्या निर्णय कायम करण्याची शक्यता आहे. पीक विमा योजनेमध्ये बदल करण्यासाठी कृषी आयुक्तालयाचा राज्य सरकारला अहवाल सादर करण्यात आला आहे. यासंदर्भात आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बैठकीत निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. राज्यात एकूण १.७१ लाख शेतकऱ्यांनी पीक विमा घेतला आहे. त्यापैकी ८५ टक्के खातेदार शेतकरी हे अल्पभूधारक आहेत.

# पुढील चार दिवस रात्री अकरा नंतर शिर्डी बंद!

**दैनिक आपला विदर्भ**

**शिर्डी/प्रतिनिधी :** दुहेरी हत्याकांडानंतर शिर्डीतून एक मोठी बातमी समोर आली आहे. शहराची सुरक्षितता आणि कायदा सुव्यवस्थेसंबंधी निर्णय घेण्यात येणार असून याच पार्श्ववभूमीवर पुढील चार दिवस रात्री अकरा नंतर शिर्डी पूर्णपणे बंद राहणार असल्याची माहिती मिळाली आहे. वाढती गुन्हेगारी लक्षात घेता त्यावर उपाययोजना आखण्यात येणार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शिर्डीत गेल्या काही दिवसांपासून घडणाऱ्या घटनांनंतर पोलिसांनी केलेल्या कारवाईवर ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. अहिल्यानगर पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेचे एक स्थायी पथक शिर्डीत नियुक्त करण्यात आले आहे. आठ जणांचे हे पथक येथील गुन्हेगार आणि त्यांच्या कारवायांवर लक्ष ठेवून राहणार आहे. तसेच शिर्डीत राहणाऱ्यांचे आधार, रेशनकार्ड यांची चौकशी नगरपालिकेकडून करून घेण्यात येणार आहे. यात काही चुकीचे आढळून आले तर संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे. शिर्डी शहरात पोलिसांच्या रेकॉर्डवर लहानमोठे ११४ तर १२ सराईत गुन्हेगार आहेत. यातील १३ गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई करण्यात आलेली आहे; तर १३ जणांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. अन्य जिल्ह्यांतून तडीपार केल्या जाणाऱ्या गुन्हेगारांना यापुढे शिर्डीत आश्रय देऊ नये, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

डॉ. विखे काय म्हणाले ?



डॉ. विखे म्हणाले 'रात्री अकरा वाजता साईबाबांची आरती संपल्यानंतर शिर्डी पूर्णपणे बंद राहणार असल्याची सूचना पुढील चार दिवस गावात दवंडी देऊन दिली जाईल. त्यानंतर या निर्णयाची कडक अंमलबजावणी केली जाईल. रात्री साडेअकरा वाजता सर्व हॉटेल बंद करण्याचा निर्णय ग्रामसभेत झाला आहे. शिर्डीत राहणाऱ्यांचे आधार, रेशनकार्ड यांची चौकशी नगरपालिकेकडून करून घेण्यात येणार आहे. यात काही चुकीचे आढळून आले तर संबंधितांवर कारवाई केली जाईल. साईप्रसादालयातील भोजनावरून आपल्यावर टीका झाली. मात्र, यासंबंधी करण्यात आलेल्या उपाययोजनांचे चांगले परिणाम दिसून येऊ लागले आहेत. त्यामुळे शिर्डी बाहेरच्या लोकांची टीका आणि सल्लेही ऐकून घेतले जाणार नाहीत. येथील ग्रामस्थांच्या पुढाकारातून आणि गरजेनुसार निर्णय घेतले जातील,' असेही विखे म्हणाले.

## संक्षिप्त...

### कोल्हापूर जिल्ह्यात जीबी सिंड्रोमचा पहिला मृत्यू




**दैनिक आपला विदर्भ**

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** पुणे शहरात थैमान घातलेल्या जीबी सिंड्रोममुळे आरोग्य यंत्रणेची तारांबळ उडत असताना कोल्हापूर जिल्ह्यात धक्कादायक बातमी समोर आली आहे. गुइलेन-बॅरे सिंड्रोम बाधित ६० वर्षीय महिलेचा सीपीआरमध्ये मृत्यू झाल्याची माहिती पुढे आली आहे. दरम्यान, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या जिल्ह्यात जीबीएसचा हा पहिलाच मृत्यू आहे. तर या महिलेवर गेल्या काही दिवसांपासून उपचार सुरू होते, मात्र नागरिकांनी गोंधळून न जाता सतर्क राहण्याचा आवाहन छत्रपती प्रमिला राजे रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. शिशीर मिरगुंडे यांनी केलं आहे.

### न्यायालयाच्या निर्णयानंतर साडेसहा हजार कुटुंबे होणार बेघर



**दैनिक आपला विदर्भ**

**कल्याण/प्रतिनिधी :** डोंबिवलीतील एक दोन नाही तर सुमारे साडे सहा हजार कुटुंब येत्या काही दिवसात बेघर होणार आहेत. कल्याण डोंबिवली महापालिकेचे खोटे कागदपत्र सादर करत महारेराचे प्रमाणपत्र मिळवणाऱ्या ६५ इमारती कारवाईच्या फेऱ्यात सापडल्या आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर डोंबिवलीतील ६५ इमारती जमिन दोस्त होणार आहेत. यातील डोंबिवली कोपर येथील साई गॅलेक्सी या इमारतीमधील रहिवाशांची याचिका उच्च न्यायालयाने फेटाळल्यानंतरया सर्वच इमारतीमधील रहिवासी हवालदिल झाले आहेत. लाखोंचे कर्ज घेऊन घर घेतले घर घेण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांनी कर्ज दिले, प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळाला, महापालिकेचा टॅक्स लागला, असे असतानाही आमच्या इमारती अनधिकृत असल्याचे जाहीर करत आम्हाला रस्त्यावर आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र, याच वेळी आमची फसवणूक करणारा बिल्डर मात्र मोकाट फिरत आहे आम्हाला न्याय द्या अशी अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.

### महाराष्ट्राला समृद्धी महामार्गाची गरज नाही शेत रस्ते मोकळे करा, शेतकऱ्यांचे तहसीलदारांना स्मरणपत्र





**दैनिक आपला विदर्भ**

**जळगाव/प्रतिनिधी :** राज्यात गेल्या सहा महिन्यापासून शिव पानंद शेत रस्ता चळवळ सुरू आहे. राज्य सरकारने देखील शेतकऱ्यांच्या शेतातील शेत रस्ते मोकळे करण्यासंदर्भात महसूल मंत्र्यांनी आदेश दिलेले आहे. जे कोणी शेत रस्ता अडवत असेल तर त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा असे राज्य सरकारचे आदेश असताना शेतकऱ्यांच्या शेतातील शेत रस्ते स्थानिक प्रशासनाच्या वतीने मोकळे केले जात नाही. शंभर दिवसाच्या राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमात शेत रस्त्यांचा देखील विषय आहे. याला जिल्हाधिकारी यांनी देखील मनावर घेऊन काम करीत आहे. परंतु स्थानिक प्रशासनाला शेत रस्त्यांसंदर्भात वारंवार पत्रव्यवहार करून देखील त्याची पाहिजे त्या प्रमाणात अंमलबजावणी करण्यात येत नाही. आज तालुक्यातील शेतकऱ्यांनी डोक्यावरती शेत तिथं रस्ता गाव तिथे समृद्धी असे लिहिलेले टोप्या घालून तहसीलदारांना स्मरणपत्र देण्यासाठी आले. यावेळी शेतकऱ्यांनी सांगितले महाराष्ट्र राज्याला समृद्धी महामार्गाची गरज नाही आहे, तर शेतकऱ्यांना शेतातील रस्ते मोकळे करण्याची गरज आहे शेतकऱ्यांच्या शेत रस्त्यांना मोकळे करा आणि आम्हालाही मोकळे श्र्वास घेऊ द्या असेच शेतकऱ्यांनी सांगितले.

# धनंजय मुंडेंनी राजीनामा दिल्याशिवाय बीडमधील गुंडागर्दी संपणार नाही - अंबादास दानवे

**दैनिक आपला विदर्भ**

**जालना/प्रतिनिधी :** धनंजय मुंडेंनी राजीनामा दिल्याशिवाय बीडमधील गुंडागर्दी संपणार नसल्याचं म्हणत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्य सरकावर टीका केली आहे. जालन्यात अंबादास दानवे यांनी पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली, त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. राज्य सरकारला बीडचं बिहार बनवायचं आहे. त्यामुळं बीडमधील गुंडागर्दी संपवायची असेल तर धनंजय मुंडे यांनी नैतिकदृष्ट्या राजीनामा द्यावा, अशी मागणी अंबादास दानवे यांनी




केली आहे. दरम्यान, यांनी बरेच पापं केली असतील म्हणून धुवायला जात असतील असं म्हणत अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयागराजच्या दौऱ्यावरही दानवेंनी टीका केली आहे.

## धुळ्यात अन्न व औषध विभागाने लाखोंचा गुटखा पकडला

**धुळे/प्रतिनिधी :** अन्न व औषध प्रशासन विभागाने छापा टाकून लाखोंचा गुटखा पकडला. ही कारवाई शुक्रवारी दीड वाजेच्या सुमारास मौलवीगंज भागात घडली. जप्त केलेला गुटख्याचा साठा अंदाजे १० लाखांचा असण्याची शक्यता आहे. दुपारी उशिरापर्यंत कारवाई करण्याचे काम सुरु होते.



नाशिक येथील अन्न व औषध विभागाला धुळयातील घडयाळवाली मशिदजवळ असलेल्या मौलवीगंज भागातील मदिना स्वीट दुकानात महाराष्ट्रात प्रतिबंधीत असलेला विमल गुटखाचा साठा लपवून ठेवल्याची माहिती मिळाली होती. माहिती मिळताच धुळ्यातील अन्न व औषध विभागाच्या अधिकाऱ्यांनी अचानक छापा टाकला असता या ठिकाणी लपवून ठेवलेला विमल गुटखाचा साठा जप्त करण्यात आला. जप्त केलेला गुटख्याचा माल १० लाखांचा असण्याची शक्यता संबंधित विभागाने वर्तवली असून या प्रकरणी आझाद नगर पोलिसात गुन्हा दाखल करण्याचे काम सध्या सुरु आहे.

# धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्या

## आमदार जितेंद्र आव्हाड यांची पत्रकार परिषद

**दैनिक आपला विदर्भ**

**ठाणे/प्रतिनिधी :** साडेचार तास भेट झाली, चार दिवसापूर्वी भेट झाली. लपून भेटले हे मला तरी योग्य वाटणार नाही. डिसेंबर महिन्यापासून धस धनंजय मुंडेवर तोफा टाकत होते, अचानक म्हणतात मी राजीनामा मागितला नाही. हे सर्व प्रकरण उघडकीस कसं आलं तर, बावनकुळे यांनी सांगितलं, हे दोघे भेटले आणि मी होतो साडेचार तास भेटीदरम्यान. संतोष शिंदेंच्या आईला जसा त्यांनी सल्ला दिला. कोणी काय केला असेल, त्यांना माफ करा तसेच त्यांनी धनंजय मुंडेंना देखील माफ करून टाका, अशी बोचरी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केली. ते ठाणे येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.



आमदार जितेंद्र आव्हाड पुढे म्हणाले की, एवढ्या प्रामाणिकपणे हा माणूस काम करत होता. अचानकपणे यु टर्न का मारलाय हे काय कळायला मार्ग नाही. साडेचार तास भेटले असतील तर मराठीत एक गाणं म्हटले असेल तुझा गळा माझा गळा गुंफू मोत्याचा माळा. महाराष्ट्राने जे दोन महिने बघितलं ते सर्व महाराष्ट्राने विसरून जायचे आहे. एखादा विषय हातात घेतल्यावर तो तडीस नेणे तो स्वभाव गुण समजू शकतो पण तो सोडून देणे हे दुर्गुण असतं. बीडच्या राजकारणात दोघांचा सख्याच होतं.

आका आका आहे. अजूनही अजित पवार म्हणताहेत राजीनामा घेणार नाही, एग्रीकल्चरचा घोटाळा बाहेर आला हार्वेस्टरचा घोटाळा बाहेर आला. दहा रुपयांची वस्तू पन्नास रुपयाला घेतल्याचा घोटाळा बाहेर आला. एकनाथ शिंदे यांना काय माहिती नसताना देखील त्यांना ओढून घेतल त्या प्रकरणात.आज अजित पवार म्हणाले राजीनामा घेणार नाही, तुम्हाला कोण सांगतंय राजीनामा घ्यायला राजीनामा घ्यायचा असेल तर मुख्यमंत्री घेतील. विरोधी पक्षाची ठाम भूमिका आहे आम्ही राजीनामा घेणारचं.

तुम्ही शेतकऱ्यांना फसवणार, तुम्ही कृषी खात्यात भ्रष्टाचार करणार, हार्वेस्टर संदर्भात वाल्मिक कराड तुमचे पैसे जमा करणार, तुमच्या बंगल्यामध्ये मीटिंग होणार, तो वाल्मिक कराड म्हणणार तो माझा माणूस आणि तो तिथे मर्डर करणार. तुमच्या इलेक्शनच्या वेळेस कैलास फड नावाचा माणूस भूत कॅप्चर करणार. गुन्हा नोंदवला जातो, तो तुमचा खास माणूस जो स्टेटस ठेवतो तुमच्याबद्दल चांगलं बोलतो.पोलीस त्याच नावही घेत नाही. पुण्यामध्ये यंत्रणा तुमच्या ताब्यात आहे. यंत्रणा तुमच्या ताब्यात आहे.म्हणून आम्ही म्हणतो की, राजीनामा घ्यायला पाहिजे.

दोघांनी गाणी म्हंटले असतील ये दोस्ती हम नही छोडेंगे. दोस्त दोस्त ना रहा, प्यार प्यार ना रहा प्रेम व्हॅलेंटाईन डे च्या दिवशी बाहेर पडलं, रोज डे च्या दिवशी पुष्पगुच्छ देऊन भेटले असतील आज बाहेर पडलं. अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केली.





# ग्रामपंचायत प्रशासन तक्रार करून त्रस्त

# संबंधित पाणीपुरवठा अधिकारी मात्र मस्त; ठेकेदार झाले सुस्त

भाग ११

पाणी पुरवठा अधिकाऱ्यांचा गलथान कारभार पुन्हा चव्हाट्यावर..



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर : तालुक्यातील अंजनी बुद्रुक येथे सण २०२२ पासून पाच कोट्यवधी रुपयाचा निधी खर्च करून सुरू झालेल्या जलजीवन मिशन अंतर मिशनचे काम अद्यापही पूर्ण झाले नाही, याबाबत ग्रामपंचायत एक नव्हे तर तब्बल सात वेळा पत्रव्यवहार करून सदर कामाची चौकशी करून दोषीवर कारवाई करावी व काम तात्काळ पूर्ण करावे याबाबत वारंवार पाठपुरावा केल्यानंतरही जल जीवन मिशनच्या अधिकाऱ्यांनी याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष केले. तर लोकप्रतिनिधी म्हणून तत्कालीन आमदारांनीही याकडे पूर्णता डोळे झाक केल्याची चर्चा मात्र चांगलीच आहे. कंत्राटदाराने मनमानी पद्धतीने काम करत शासनाच्या निधीला चुना लावला आहे.? आता सदर प्रकरणाबाबत पुन्हा ग्रामपंचायतच्या वतीने तक्रार केली आहे. या तक्रारीवर अधिकारी निर्णय घेतात की नाही की येरे माझ्या मागल्या याप्रमाणेच दुर्लक्ष करतात याकडे जनतेचे लक्ष लागलेले आहे.**



देविदास खनपटे
मुख्य संपादक

मेहकर ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता यांना तालुक्यातील अंजनी बुद्रुक ग्रामपंचायत च्या वतीने १४ फेब्रुवारी २०२५ रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अंजनी बुद्रुक येथील जल-जिवन मिशन अंतर्गत निकृष्ठ कामाची चौकशी करावी, याबाबत ग्रामपंचायत च्या वतीने वारंवार निवेदने देऊन सदर काम होय अंदाजपत्रकानुसार व दर्जेदार करावे अशी मागणी केली आहे मात्र पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची याकडे कायम दुर्लक्ष केले आहे परिणामी अंजनी बुद्रुक येथील ग्रामस्थांना पिण्याच्या गंभीर पाण्याच्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागत आहे. अंजनी बु येथे शासनाने ५ कोटी रुपयाची नळ योजना जल-जिवन मिशन अंतर्गत मंजूर करून आज जवळपास दीड वर्ष होत आहेत. पहिली योजना कै. शामराव कोंडूजी आल्हाट यांच्या कार्यकाळात अतिशय चांगल्या प्रतीची पूर्ण झाली होती. ती योजना आजही सुव्यवस्थित आहे. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे तिचे पाणी कमी पडत आहे. त्यामुळे जल-जिवन मिशन अंतर्गत नळ योजना मंजूर करण्यात आली. सदर काम मागील दीड वर्षापासून सुरु आहे. आजही दररोज गावातील निकृष्ठ केलेली पाईपलाईन फुटत आहे त्यापोटी आजपर्यंत ग्रा. पं.ला साहित्यापोटी १ लाख १० हजार ७१० रुपये व मजुरीपोटी ८३ हजार ७७० रुपये खर्च आला आहे. संबधित ठेकेदारास माहिती देऊन सुद्धा लिकीज काढले जात नाही. त्यामुळे जनता दररोज ग्रा.पं. वर येवून गोंधळ घालत आहे.व ते लिकीज ग्रा.पं.ला काढावे लागत आहे. पाणीपुरवठा विहिरीचे २० फुट खोदकाम अजूनही अपूर्ण आहे. गावातील वितरण व्यवस्था दररोज फुटत आहे. ती चांगल्या प्रतीचे पीव्हीसी पाईप टाकुन बदलणे गरजेचे आहे. टाकीचे बांधकाम व त्यावर चढण्यासाठी टाकलेल्या लोखंडी शिड्या ज्यावर आजीबात चढ़ता- उत्तरता येत नाही. त्या दुरुस्ती करणे आवश्यक आहे. गावातील संपूर्ण पाईप लाईन रस्त्याच्या मधोमध दाबली आहे. ती उखळून रस्त्याच्या हद्दीबाहेर ग्रा.पं. हद्दीत टाकावी. स्वीचरूम ते पा.पु. विहिरीवर ये-जा करणेसाठी सिमेंट कॉंक्रीट पूल बांधलेला नाही ते काम पूर्ण करावा, मागील ८ महिन्यापासून डीपी व पोलचे पैशाचा भरणा केलेला असून ते काम आजही अपूर्ण आहे ते पूर्ण करावे. त्यामुळे मागील १ वर्ष पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. सदर योजनेबाबत झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषीवर कारवाई करावी तसेच योजनेचे अपूर्ण काम पूर्ण करावे याबाबत ग्रामपंचायत च्या वतीने वारंवार मागणी करूनही याकडे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे. तसेच मायबाप म्हणून व लोकप्रतिनिधी म्हणून मतदार संघाचे प्रतिनिधित्व करत असलेल्या लोकप्रतिनिधीने आवाज उठवणे गरजेचे असताना मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधींनी याबाबत चुप्पी साधल्याने ठेकेदाराने मनमानी करत शासनाच्या कोट्यावधी रुपयांच निधीला चुना लावण्याचे काम केले आहे. आतातरी ग्रामपंचायतच्या तक्रारीचे दखल घेत अधिकारी पदाधिकाऱ्यांनी दोषीवर कारवाई करीत अपूर्ण राहिलेले काम पूर्ण करून नागरिकांच्या पिण्याची पाण्याची समस्या निकाली काढावी, लागली अशी अपेक्षा अंजनी बुद्रुक येथील ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

**JAL JEEVAN MISSION**

## तत्कालीन आमदाराची चुप्पी

मेहकर मतदारसंघातील अंजनी बुद्रुक येथील जल जीवन मिशनच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याने याबाबत ग्रामपंचायतच्या वतीने सतत तक्रारी करण्यात आल्या. मात्र, गेंड्याची कातडी अंगावर घेतलेल्या अधिकाऱ्यांनी या तक्रारीची दखल घेतली नाही. परिणामी दोन वर्षापासून अंजनी बुद्रुक येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या समस्येने सामोरे जावे लागत आहे. नागरिकांच्या सोयीसाठी शासनाने केलेला खर्चही व्यर्थ जात असल्याचे चित्र आहे. अंजनी बुद्रुक येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा मिळावी यासाठी शासनाने तब्बल पाच कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून जलजीवन मिशनचे काम हाती घेतले होते. मात्र कंत्राटदराने अधिकारी- पदाधिकारी यांच्या अर्थपूर्ण दुर्लक्षाने ठेकेदाराने मनमानी करत शासकीय निधी हडप केला असल्याचा आरोप ग्रामस्थ करीत आहेत. तेव्हाच तत्कालीन आमदारांनी याबाबत आवाज उठवला असता तर नागरिकांवर ही वेळ आली नसती, असा प्रश्नही ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत. व तत्कालीन आमदारांनी याबाबत चुप्पी का साधली असा प्रश्नही ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत.

## विद्यमान आमदाराच्या भूमिकेकडे लागले लक्ष

मेहकर तालुक्यातील अंजनी बुद्रुक येथील जलजीवन मिशनच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करून ठेकेदाराने अधिकाऱ्यांना हाताशी धरून शासनाच्या तब्बल पाच कोट्यावधी रुपयांच्या निधीला चुना लावण्याचे काम केले आहे. याबाबत अंजनी बुद्रुक ग्रामपंचायत च्या वतीने वारंवार मेहकर ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या उपअभियंताकडे वारंवार तक्रारी केल्या. मात्र, अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याने कंत्राटदराने मनमानी करत शासकीय निधी हडप करण्याचा प्रयत्न करण्यात आला. याबाबत लोकप्रतिनिधींनीही ठेकेदाराला पाठिशी घालण्याचे काम केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. आता मेहकर मतदार संघाला उच्चविद्याविभूषित व सर्व बाबीचे ज्ञान असलेले आमदार मिळाले असल्याने विद्यमान आमदार सिद्धार्थ खरात यांच्याकडून याबाबत न्याय मिळण्याची अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे. आमदार सिद्धार्थ खरात यांनी या प्रकरणाकडे गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन शासकीय निधी हडप करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी पाठपुरावा करावा, त्याचबरोबर अपूर्ण काम पूर्ण करावे, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त करीत आहेत.असे असताना पूर्वीच्या आमदाराप्रमाणेच आताचे आमदार दुर्लक्ष करतात की, या प्रकरणाचा छडा लावतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागलेले आहे.

# अवैध अमंलीपदार्थ बाळगुन विक्री करणाऱ्या इसमावर डिटेक्शन बेंच उमरखेड यांची कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** उमरखेड शहरात गुन्हेगारी आलेख वाढत चालला आहे. उमरखेड शहरात अवघ्या महिनात लूटमारी,चोरी, दरोडा व अवैध शस्त्र बाळगणे, असे अनेक अवैध धंदे यांनी कळस गाठला आहे, म्हणूनच की काय ?उमरखेड शहरात कोणत्याही प्रकारचे अवैद्य धंदे, शस्त्र बाळगणाऱ्या तसेच आरोपी शोध, अवैद्य धंदे, गुंगीकारक औषध द्रव्याची तस्करी समुळ उच्चाटन व्हावे या करीता पोलीस अधिक्षक, कुमार चिंता यांनी पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन उमरखेड यांना आदेश देऊन गुप्त माहिती काढून छापा कारवाई करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

याअनुषंगाने पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन उमरखेड अधिनिस्त डिटेक्शन बॅच (उंह) पथकाने गोपनिय माहीती द्वारे १३फेब्रुवारी रोजी पोलीस स्टेशन उमरखेड शहर हद्दीतील रहिमनगर उमरखेड कडील ग्राम बिटरगाव (खु ) कडे कच्च्या रस्त्याला लागुन असलेल्या कॅनालच्या पुलावर इब्राहिम खान पिर खान नावाचा व्यक्ती अवैद्यारित्या गांजा आमंली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने घेवुन जात असल्याची माहीती मिळताच डिटेक्शन बेंच (उंह) पथक उमरखेड यांनी तात्काळ वरिष्ठांना याबाबत अवगत करुन बिटरगाव (खु ) कॅनॉलच्या कच्च्या रस्त्याने सापळा रचून इब्राहिम खान पिर खान वय अंदाजे (५५) यास ताब्यात घेवुन त्याच्या ताब्यातली थैलीची पाहणी केली असता त्यामध्ये हिरवट काळपट गांजा आमंली पदार्थ १ किलो १९६ ग्राम गांजा किंमत अंदाजे २३,९२०/-रुपये चा मुद्देमाल सापडला.जप्तीसह आमंली औषधी मनप्रभावी पदार्थ अधिनियम चे कलम ८ (क), २० (ब), (२), (ब) अन्वये अपराध क्र. ११/२०२५ प्रमाणे पोलीस स्टेशन उमरखेड येथे गुन्हा नोंद करण्यात आला.

> **पोलीस स्टेशन उमरखेड हे अवैध्य धंदे, शस्त्र बाळगणारे तसेच गुंगीकारक औषध द्रव्याची तस्करीचे उच्चाटन करण्यास प्रतिबध्द असुन यापुढे यासंबधी माहीती असल्यास सदरची माहीती जनतेने पोलीसांना कोणतीही भिती मनात न बाळगता पुरवावी व पोलीसाना सहकार्य करण्याचे आव्हान केले आहे.**




सदर कारवाई यवतमाळचे पोलीस अधीक्षक कुमार चिंता , यवतमाळचे अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड उमरखेड, ठाणेदार पोलीस निरीक्षक, शंकर पांचाळ यांचे मार्गदर्शनाखाली पो.स्टे. उमरखेड डिटेक्शन बॅचचे (उंह) पो.उप.नि. सांगर इंगळे, पोहवा संदिप ठाकुर, पोहव दिनेश चव्हाण, पो.कॉ संघशिल टॅबरे, पो.कॉ. निवृत्ती माहानळ, पो. कॉ. घुसे, म.पो. कॉ.सिमा इंगळे, चापोहवा समिर पो.स्टे. उमरखेड यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. पुढील तपास स.पो.नि. पांडुरंग शिंदे हे करीत आहेत.

# पांदण रस्त्यावर वरील नाल्यावर स्लॅब टाकून द्या

## काळदी येथील लिलाबाई हटकर यांचे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** तालुक्यातील बाळदी येथील ग्रामपंचायत हद्दीतील पांदण रस्त्यावरील नाल्यावर स्लॅप टाकून ये -जा करण्याची सुविधा करावी व नागरिकांचे आरोग्य अबाधित राखावे तसेच संबंधित ग्रामसेकाची खातेनिहाय चौकशी करावी, अशी मागणी तालुक्यातील काळदी येथील लिलाबाई लक्ष्मणराव हटकर यांनी उमरखेड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, उमरखेड तालुक्यातील काळदी येथील ग्राम पंचायत हद्दीतील पांदण रस्त्यावरील नाल्यावर ये-जा करण्यास नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांची ही समस्या लक्षात घेता नाल्यावर स्लॅब टाकून नागरिकांसाठी ये जा करण्याची सुविधा करावी, सदर लाला हा गावातील बंडू पोटे याच्या घरापासून ते जिल्हा परिषद शाळा, लिलाबाई हटकर याच्या घरापर्यंत आहे. उघड्या नाल्यांमुळे नाल्या शेजारच्या नागरिकांचे व




शाळेच्या विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

याबाबत वारंवार संबंधित ग्रामसेवकांना माहिती देऊन सुद्धा दखल घेण्यात आली नाही.या उलट ग्रामसेवक डी.बी. सूर्यवंशी यांनी मला नाला साफसफाई करण्यासाठी १० हजार रुपयाची मागणी केली. नाला साफसफाई किंवा यावर स्लॅब टाकण्याकरिता माझ्याकडे कोणताच निधी उपलब्ध नाही, असे काम आमदार निधीमधून होत असतात, असे उडवाउडवीचे उत्तर देऊन मला गप्प केले. तसेच ग्रामसेवकाची खातेनिहाय चौकशी करावी, या ग्रामसेवकाला गावातील इतर ठिकाणचे कामे करता येतात मात्र, बौद्ध वस्ती किंवा दलित वस्ती मधील कामे जाणून बुजून करीत नाहीत. या ग्रामसेवकाला बौद्ध वस्ती, दलित वस्तीमध्ये काम करण्याची एलर्जी आहे. असा प्रश्न उपस्थित करून सदर ग्रामसेवकाचे वाढदिवसाच्या खाती न्याय चौकशी करून कारवाई करावी अन्यथा आपल्या कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल असा इशाराही लिलाबाई लक्ष्मणराव हरकट यांनी गटविकास अधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदनाच्या प्रतिलिपी जिल्हाधिकारी यवतमाळ, यवतमाळ जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी,यवतमाळ भीम टायगर सेना जिल्हा कार्याध्यक्ष श्याम धुळे यांना पाठवलेल्या आहेत.